जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ.
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ पुणें, बुधवार, तारीख २ फेब्रुवारी, १९३८ अंक ५




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

गव्हाचे पोहे
(REGD.) ( BLOSSOM ) (REGD.)

कित्येकांना गहूं खाण्याची इच्छा असते. पण प्रकृतीमुळें अगर हवामानामुळें सोसत नाहीं. अशा लोकांना हे गव्हाचे पोहे चांगले मानवतात. विशेषतः लहान मुलांना सकाळचें किंवा मधल्या वेळेचें खाणें म्हणून ह्यांचा उपयोग हितकारी ठरतो.

ह्या पोह्यांचा तिखट व गोड चिवडा होतो. तसेंच हे दह्या-दुधांतून खातां येतात.

५५३ सदाशिव पुणें २. — भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे कारखानदार.

शिवणकलेचें अनुभविक शिक्षण मिळण्याचें हिंदुस्थानांत फक्त हें एकच ठिकाण
दि मॉडर्न टेलरिंग इन्स्टिट्यूट
डेक्कन जिमखाना, पुणें नं. ४
चालक—एम. एन. पाटसकर. F. C. D. (London)

— मनपसंत काम —
वक्तशीर-पणाची ] रिसवूड ब्रदर्स-टेलर्स [ गॅरंटी
सदाशिव हौदानजिक, पुणें.




स्टॉकिस्ट : मा. गो. कुलकर्णी, किराणा मालाचे व्यापारी, पुष्करणी चौक, पुणें २

ब्यांकेच्या उतरत्या व्याजाचे काळांत
डॉन ऑफ इंडियाच्या ६% मासिक आवक ठेव योजनेचा फायदा ता. ३१-३-३८ पर्यंत देण्यांत येईल. माहिती करितां लिहा.
जनरल म्यानेजर—डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

अप-टु-डेट शिलाई करतां
माहिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा
बुधवार चौक, पुणें ] १२ तासांत कपडे शिवून मिळतील. [ खादी भांडाराचे शेजारी

# विविध माहिती

**सावकारी-नियंत्रण कायदा**

सावकारी-नियंत्रण बिलाचें पहिलें वाचन मुंबई असेंब्लींत होऊन तें बत्तीस सभासद असलेल्या कमिटीकडे विचारासाठी सोपवण्यांत आलें.

**बेकारीचीं कारणें व निवारणावर उपाय**

देशांत बेकारी पसरली आहे, तिचीं कारणें शोधून काढण्यांत येऊन तिच्या निवारणाचे उपाय सुचवले जावे ह्यासाठीं सदरहू प्रश्नाची चौकशी करण्याकरितां एक कमिटी नेमली जावी ह्या आशयाचा पुढें आलेला ठराव मुंबईच्या असेंब्लीनें मान्य केला.

**बेकारांस काम मिळवून देण्याची व्यवस्था**

बेकार लोकांची नोंद होऊन त्यांस योग्य काम मिळवून देण्यासाठी एक बेकार-कचेरी सरकारनें स्थापावी, ह्या अर्थाचा ठराव मुंबईच्या असेंब्लींत मांडण्यांत आला होता, परंतु असल्या व्यवस्थेचा कांहीं उपयोग होणार नाहीं, ह्या मुद्यावर त्यास सभेनें मान्यता दिली नाहीं.

**संयुक्त प्रांतांत साखर-कारखान्यांच्या नियंत्रणाचें बिल मान्य झालें**

ऊंस पिकवणाऱ्या व तो कारखान्यांस पुरवणाऱ्या शेतकऱ्यांस त्यांच्या मालाची ठराविक किंमत मिळावी आणि ह्याकरितां साखरेच्या धंद्याचें योग्य संघटन व्हावें ह्या उद्देशानें संयुक्त प्रांतांत करण्यांत आलेल्या योजनेचा कायदा तेथील असेंब्लींत मान्य झाला आहे.

**बी. बी. अँड सी. आय. रेल्वेचें उत्पन्न**

एप्रिल, १९३७ च्या प्रारंभापासून गेलया २० जानेवारीपर्यंत बी. बी. अँड सी. आय. रेलवेस ९ कोटि ३७ लक्ष रुपये इतकें उत्पन्न झालें. पूर्वीच्या वर्षांतल्या ह्याच मुदतींतल्या उत्पन्नाच्या मानानें हा आकडा फक्त २० लक्ष रुपयांनीं अधिक आहे.

**क्षयरोगामुळें मृत्यू आणि हलकी रहाणी**

हिंदुस्थान सरकारच्या कचेऱ्यांमधील कनिष्ठ वर्गाच्या नोकर-लोकांत होणाऱ्या मृत्यूंपैकीं शेकडा ६१ इतके क्षयरोगाचे बळी असतात असें चौकशींत बाहेर आलें आहे. ह्या नोकरांपैकी मोठी संख्या पहाडी लोकांची असते आणि त्यांचा पगार आणि रहाणी हलक्या प्रतीची असते, हें कारण त्यांचे मधील क्षयरोगाच्या प्राबल्याच्या मुळाशीं असावें असें म्हणतात.

**क्षयरोग-निवारण निधीस देणग्या**

बादशहांच्या नांवानें काढलेल्या क्षयरोग निवारण निधीस हिंदी संस्थानांकडून मोठमोठ्या देणग्या मिळत आहेत.

**अंतरिक्षांत टक्कर—थोडक्यांत निभावलें !**

नवीन एक चिमुकला ग्रह आणि पृथ्वी ह्यांची टक्कर होण्याचा योग आला होता, पण तो थोडक्यांत वांचला असें एका दक्षिण आफ्रिकेंतल्या ज्योतिषशास्त्रज्ञानें प्रसिद्ध केलें आहे. गेल्या ऑक्टोबरच्या ३० तारखेस हा ग्रह पृथ्वीस ४ लक्ष मैलांच्या अंतरावरून चाटून गेला !

**ग्रेट ब्रिटनमधील झाडांची खानेसुमारी**

ग्रेट ब्रिटनमधील झाडांच्या खानेसुमारीच्या कामास प्रारंभ झाला असल्याचें, फॉरेस्ट्री कमिशनचे अध्यक्ष, सर रॉय रॉबिनसन, ह्यांनीं नुकतेंच जाहीर केलें. १४ वर्षांमागें केलेल्या गणतीपेक्षा प्रस्तुत गणती ज्यास्त पद्धतशीर होणार आहे. ही खानेसुमारी पुरी होण्यास दोन वर्षे लागतील.

**शस्त्रास्त्रांची वाढ केव्हां थांबणार ?**

शस्त्रास्त्रांच्या वाढीवर अधिक खर्च करणें जागतिक अस्वस्थतेच्या दृष्टीनें अमेरिकेस अपरिहार्य झालें आहे असें म्हणून प्रेसिडेंट रुझव्हेल्ट ह्यांनीं त्या बाबतींत मोठमोठ्या रकमांची शिफारस केली आहे

**ब्रिटिश साम्राज्यांतले श्वेतवर्णीय लोक**

ब्रिटिश साम्राज्यांतील श्वेतवर्णीय लोकांची संख्या शंभर वर्षांमागें २ कोटि ८० लक्ष होती ती आतां ७ कोटि ३० लक्ष झाली आहे.

**हिंद-ब्रिटन व्यापारी कराराचीं बोलणीं पुन्हां चालू**

सर महमद जाफरुल्लाखान हे विलायतेस जाऊन त्यांनीं, ग्रेट ब्रिटनचा हिंदुस्थानशीं व्यापारी करार व्हावयाचा आहे, त्याचेबाबत मध्यंतरीं बंद झालेलीं बोलणीं पुन्हां चालू केलीं आहेत.

**मोंबासा येथें हिंदी व्यापारी प्रतिनिधि**

मोंबासा (पूर्व आफ्रिका) येथें हिंदुस्थानचा व्यापारी प्रतिनिधि म्हणून मि. इस्माइल ह्यांची नेमणूक झाली आहे.

**फ्रेंच हुंडणावळीच्या दराचें स्थैर्य**

फ्रान्सच्या परराष्ट्रीय हुंडणावळीच्या दरांत फेरबदल करावा लागतो कीं काय अशी भीति मध्यंतरीं उत्पन्न झाली होती. परंतु फ्रान्सच्या मालकीचा, सोनें व इतर स्वरूपांतला पैसा अमेरिकेंत कांहीं काळपर्यंत तरी पुरेल इतका असल्यानें त्या देशाच्या हुंडणावळीच्या दरांत बदल करण्याची आवश्यकता नाहीं असें अधिकारी रीत्या प्रसिद्ध झालें आहे.

**आंतरराष्ट्रीय आर्थिक सहविचार**

आर्थिक मंदी दूर होऊन जागतिक देवघेवीस उत्तेजन मिळावें ह्या हेतूनें बेलजमचे मि. व्हॅनझीलंड ह्यांनीं आंतरराष्ट्रीय सहकारित्वाच्या कांहीं सूचना केल्या आहेत. प्रमुख राष्ट्रांची एक आर्थिक परिषद भरवण्यांत यावी आणि तिच्या मध्यें आपल्या योजनेची चर्चा व्हावी अशी त्यांची सूचना आहे. इंग्लंडनें या सूचनेस संमति दर्शवली आहे.

**साखरेच्या धंद्याचे संघटनासाठी अखिल भारतीय मध्यवर्ती मंडळ**

संयुक्त प्रांत व बिहार ह्या प्रांतांत तेथील सरकारांनीं साखरेचे कारखाने व ऊंस करणाऱ्या शेतकऱ्यांचा धंदा ह्यांचे नियमनार्थ कायदे केल्यामुळें हिंदी साखरेच्या राष्ट्रीय धंद्याचे व्यवस्थेत संघटितपणा आणणें अगत्याचें झालें आहे असें दिसून आल्यावरून इंडिअन सेंट्रल कॉटन कमिटीच्या धर्तीवर साखरेकरितां एक मध्यवर्ती मंडळ स्थापन करण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे.

**हिंदुस्थानच्या पोस्टखात्याचा नफा**

हिंदुस्थानच्या पोस्ट व टेलिग्राफ खात्यास १९३६-३७ सालीं १४½ लक्ष रुपये निव्वळ नफा झाला. १९२६-२७ सालानंतर असल्या नफ्याचें हें प्रथम वर्ष होय.

**पोस्टखात्याचा प्रचंड कारभार**

हिंदी पोस्टखात्यानें १९३६-३७ मध्यें एकूण १२२ कोटि पत्रें, पार्सलें इत्यादि जिन्नस हाताळले. मनीऑर्डरी केल्या त्यांची एकूण रकम ८१ कोटि रुपये आणि व्हॅल्यू पेअबल पोस्टानें जमा झालेली रकम सुमारें १८½ कोटि रुपये भरली.

**मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत**

| | किंमत रुपये |
|---|---|
| १६-१-३८ ते २२-१-३८ | ७५,९८,७४४ |
| २३-१-३८ ते २९-१-३८ | १०,०७,१२० |
| २१-९-३१ ते २९-१-३८ | ३०९,७१,४०,०६७ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ५० | ४ गोवर्धन दिनानिमित्त सभा | |
| २ कपाशीच्या धंद्याचें भवितव्य ( अग्रलेख १ ) | ५१ | ६ झारापकर टेलरिंग कॉलेज—सरकारी परीक्षेचा निकाल | ५४ |
| ३ म्हैसूर सिल्क फिलेचर्स लि. ( अग्रलेख २ ) | ५२ | ७ सोसायटीचें दप्तर ( पुस्तक परीक्षण ) | ५४ |
| ४ अल्प प्रारंभ, अवाढव्य विस्तार | ५२ | ८ चांदीच्या बाजाराची चमत्कारिक स्थिति | ५५ |
| ५ स्फुट विचार : १ रिझर्व्ह बँकेचा २८ लक्ष रुपये नफा—२ मुंबईच्या रोखे-बाजाराची घडी नीट केव्हां बसणार!—३ नवीन कायदे—मराठा चेंबरचा अभिप्राय. | ५३ | ९ सावकारी नियंत्रण बिल—प्रो. काळे यांचें भाषण | ५५ |
| | | १० ब्लॉसम मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लि. | ५७ |
| | | ११ शेअर बाजारांतील किंमती | ५८ |
| | | १२ निवडक बाजारभाव | ५८ |



# अर्थ

बुधवार, ता. २ फेब्रुवारी, १९३८


## कपाशीच्या धंद्याचें भवितव्य

ज्यास जगामध्यें चोहोंकडे मागणी असते अशा मालास जागतिक किंमत असते असें म्हणतात. वहातुकीचीं साधनें आणि माल साठवण्याची व पाठवण्याची पद्धति ह्यांमध्यें अलीकडे पुष्कळच प्रगति झाल्या कारणानें अनेक जातींच्या मालास जागतिक बाजारपेठांत मागणी उत्पन्न झाली असून त्याच्या किंमतीसहि जागतिक स्वरूप प्राप्त झालें आहे. मालाच्या प्रती भिन्न भिन्न असल्या आणि त्यांची वहातुक हजारों मैल अंतरावर होत असली तरीहि त्यांच्या किंमती परस्परावर अवलंबून राहतात. एका जातीच्या ऐवजी मालाची दुसरी जात वापरली जाते आणि मागणी-पुरवठ्याचा संबंध बदलतो. ह्या कारणानें अमेरिकन कपाशीच्या पिकाचा पुरवठा कमी-अधिक होईल त्या मानानें हिंदी कपाशीच्या बाजारभावांत फेरबदल होतात, हा येथील अनुभव अनेकांस आहे. ह्या कारणानें हिंदी कपाशीच्या बाजारभावाचें भवितव्य काय आहे ह्याचा अंदाज करतांना अमेरिका व इतर देश ह्यांमध्यें कपाशीचा पुरवठा किती होण्याचा संभव आहे आणि त्यास त्या देशांत मागणी किती येण्यासारखी आहे ह्याचा अजमास बांधावा लागतो. अलीकडे कपाशीचे भाव उतरल्यामुळें हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांची मिळकत कमी होऊन येथील आर्थिक परिस्थिति अत्यंत प्रतिकूल झाली आहे आणि ह्याबाबतींत काय करावें ह्याची विवंचना जनता व प्रांतिक सरकार ह्यांस लागली आहे. कपाशीच्या जागतिक पुरवठ्याचा तिच्या बाजार भावाशीं व हिंदी शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीशीं निकट संबंध असल्यामुळें त्या विषयींची माहिती येथें देण्याचें आम्हीं योजिलें आहे.

जगांत कपाशीचें सर्वांत मोठें पीक अमेरिकेंत येतें आणि त्याचा बराचसा खप इंग्लंडमध्यें होतो. ह्या पुरवठ्याचे बाबतींत इजिप्त व हिंदुस्थान ह्या देशांस महत्त्वाचें स्थान आहे. तथापि, इतर देशांमध्यें कपाशीच्या लागवडीचा विस्तार होत असल्यामुळें जागतिक पुरवठा व बाजारभाव ह्यांचा विचार कर्तव्य असतां त्यांसहि हिशेबांत घेणें आवश्यक आहे. इतरत्र कपाशीचा पुरवठा वाढत आहे आणि त्या कारणानें अमेरिकन कपाशीच्या खपांत अलीकडे घट झाली आहे. १९३२–३३ सालीं सबंद जगांतलें कपाशीचें उत्पादन २३८ लक्ष गाठी ( एक गाठ =४७८ पौंड वजन ) इतकें होतें आणि त्यांतला अमेरिकेचा वांटा १३० लक्ष गाठी म्हणजे एकूण पिकाच्या ५४ टक्याएवढा होता. पुढें दोन वर्षांनीं म्हणजे १९३४–३५ मध्यें जागतिक उत्पादन पूर्वी इतकेंच असतांना अमेरिकन कपाशीचा हिस्सा ९४ लक्ष गाठींवर उतरून ४१ टक्के झाला. ह्यानंतर कपाशीस वाढती मागणी आली आणि १९३६–३७ सालांत जागतिक उत्पादन ३१७ लक्ष गाठी झालें आणि अमेरिकेचा हिस्सा १२४ लक्ष गाठी म्हणजे एकूण पिकाच्या ३९ टक्यांइतका झाला. ह्या आकड्यांवरून असें दिसून येईल कीं, गेल्या चार वर्षांत अमेरिकेचें पीक पूर्वीच्या मानानें वाढलेलें नाहीं, पण दुसऱ्या देशांतलें उत्पादन झपाट्यानें विस्तार पावलें आहे आणि त्याचा खपहि सुलभतेनें झालेला आहे. रशिया व चीन ह्या देशांमध्यें कपाशीच्या पिकाचा विस्तार होत आहे आणि तो माल देशांतल्या देशांत खपत आहे. ब्राझिल देशांतलें पीक तीन वर्षांत चौपट वाढलें आहे आणि त्याचा खपहि सहज होत आहे. अमेरिकन कापसाचा उठाव होण्यास मात्र अडचण भासत आहे.

चालू हंगामांत कपाशीचा जागतिक पुरवठा आणखी वाढेल असा रंग दिसत आहे. इजिप्त, चीन व ब्राझिल ह्या देशांत अधिक पीक येईल आणि हिंदुस्थानांतलें पीक गेल्या वर्षाइतकेंच होईल असा अंदाज आहे. ह्याप्रमाणें एका बाजूनें पुरवठा वाढत असतां दुसरीकडे जर्मनी व इटली ह्यांसारख्या देशांत कापसाचा खप कृत्रिम रीतीनें मर्यादित केला जात आहे. ग्रेटब्रिटन व जपान ह्यांची १९३७ सालांतली खरेदी मोठ्या प्रमाणांत झाली आहे हें खरें आहे. तथापि, अमेरिकेंतला उठाव आशाजनक नाहीं आणि तेथील कपाशीच्या धंद्याची परिस्थिति अनुकूल नाहीं. कपाशीच्या पिकाचें नियंत्रण आणि शेतकऱ्यांस सहाय ह्या विषयींचें अमेरिकन सरकारचें धोरण चालू राहील असें दिसतें. जरूरीपेक्षा अधिक कापूस बाजारांत येऊं द्यावयाचा नाहीं आणि त्याचा पुरवठा करणारांस कर्जाऊ रकमा द्यावयाच्या हें दुहेरी धोरण त्या सरकारनें अंगिकारलें आहे; त्यामध्यें तात्काल बदल होईल असें वाटत नाहीं. कपाशीचा जागतिक पुरवठा आणि तिचे जागतिक बाजारभाव ह्यांचे दृष्टीनें हिंदी कपाशीच्या पिकाचा विचार आमच्या सरकारनें केला पाहिजे. जगांत चाललेल्या उलाढालींचा परिणाम हिंदी पिकें व तीं करणारा शेतकरी वर्ग ह्यांवर काय होत आहे हें सूक्ष्म दृष्टीनें पाहून त्या संबंधांत उचित दिसणारें धोरण आखलें जाणें अगत्याचें आहे. ही बाब प्रांतिक सरकारांच्या कक्षेंतली आहे असें म्हणून मध्यवर्ती सरकारास स्वस्थ बसतां येणार नाहीं. ही सबंद राष्ट्राच्या हिताची बाब आहे आणि तिचा विचार राष्ट्रीय सरकारनें प्रांतिक सरकारांच्या सहकारितेनें करावा लागेल. सेंट्रल कॉटन कमिटी व ईस्ट इंडिया कॉटन असोसिएशन ह्या संस्थांनीं प्रस्तुत प्रश्न धसास लावला पाहिजे.

## म्हैसूर सिल्क फिलेचर्स लि.

### श्री. नारायणराव नाईक ह्यांचा धडाडीचा उद्योग

बंगलोर येथील श्रीराम सिल्क थ्रोइंग फॅक्टरीचे कार्यधुरंधर मालक, श्री. नारायणराव नाईक, ह्यांनीं रेशमी मालाच्या उत्पादनाचे धंद्यांत उच्च व मानाचें स्थान मिळविलें आहे. श्रीराम सिल्क थ्रोइंग फॅक्टरीचे मालाचा लौकिक सर्वत्र झालेला आहे व गेलीं दहा वर्षें ती यशस्वितेनें चालली आहे. जपानची सफर करून, श्री. नाईक ह्यांनीं तेथील परिस्थितीचें व उत्पादन-पद्धतीचें नुकतेंच सूक्ष्म निरीक्षण केलें आहे. रेशमाचे धंद्यांत त्यांच्या घराण्यानें तीन पिढ्या काढल्या आहेत आणि श्री. नारायणराव नाईक स्वतः सुमारें २५ वर्षे त्या उद्योगांत धडाडीनें पुढाकार घेत आहेत. रेशमाची व रेशमी मालाची हिंदुस्थानभर विक्री व्हावी, ह्यासाठी त्यांनीं बहुमोल हितसंबंध जोडून ठेवलेले आहेत. फिलेचर्सच्या उत्पादनासाठी त्यांनीं आतां नवीन कारखाना उभारण्याचें कार्य हातीं घेतलें असून त्याकरितां नवीन कंपनी स्थापन केली आहे. श्री. शालगर व श्री. कृष्णस्वामी ह्या दोन अनुभवी गृहस्थांच्या भागीदारींत मेसर्स नाईक आणि कंपनी ह्या मॅनेजिंग एजन्सीतर्फे ते म्हैसूर सिल्क फिलेचर्स लि. चा व्यवहार पहाणार आहेत. श्री. नाईक हे अर्थातच मॅनेजिंग एजन्सीचे प्रमुख भागीदार आहेत. हिंदुस्थानांत उंची दर्जाच्या रेशमाला मोठी आणि वाढती मागणी आहे; परंतु मागणीच्या मानानें फिलेचर सिल्कचा पुरेसा पुरवठा ह्या देशांत तूर्त होत नसल्यामुळें परदेशी माल फारच मोठ्या प्रमाणांत आयात होत आहे. अतिशय न्याहार आणि तलम कापड विणून तयार करण्याकरितां लागणारें उंची दर्जाचें रेशीम म्हैसुरांत पैदा करणें शक्य कोटींतील आहे हें म्हैसूर सरकारनें आतां पूर्णपणें सिद्ध करून दाखविलें आहे. परदेशी चढाओढीला न जुमानतां हिंदी रेशीम धंद्याचें डोकें वर निघावें म्हणून म्हैसूर सरकारानें हिंदुस्थान सरकाराकडून कांहीं प्रमाणांत संरक्षण मिळण्याची तरतूद केली आहे. सरकारानें जोपासनेची दक्षता बाळगल्यामुळें रेशमाचे किडे पाळण्याचा व वाढविण्याचा धंदा म्हैसुरांत सुव्यवस्थित चालू आहे. रेशमी किड्यांचे म्हैसुरी कोशिटे ( ककुन्स ) अप्रतिम दर्जाचे असून म्हैसुरी रेशीम तकाकी, मगदुर आणि सौंदर्य ह्यांबाबत नांवाजलें आहे. तथापि दुर्दैवानें चातीबद्ध करण्याचें काम सध्या हातानेंच रांगड्या पद्धतीनें होत असल्यामुळें हे नैसर्गिक फायदे बहुतांशीं वाया जातात. फिलेचर्सच्या अभावामुळें जी उणीव भासते तीमुळें परदेशी रेशमाची आयात धडाक्यानें चालू आहे.

ही उणीव भरून काढणें हा श्री. नाईक ह्यांच्या नवीन कंपनीचा मुख्य उद्देश आहे. विशेषतः उंची दर्जाचें रेशीम चातीबद्ध करण्यासाठी, सिल्क फिलेचर्सचा धंदा प्रस्थापित करण्याकरितां आणि चालविण्याकरितां, तसेंच, उपरोक्त कारखानदारीशीं अंगभूत आणि संबद्ध असलेले व्यवहार चालविण्याकरितां आणि व्यवस्था करण्याकरितां ह्या कंपनीची स्थापना झालेली आहे. जमीन, हवामान आणि अवांतर सोयींच्या दृष्टीनें म्हैसूर हें रेशमाच्या धंद्याला अतिशय सोयीस्कर आहे आणि या भागांत एकूण हिंदी रेशमाच्या पैदाशीपैकी निम्याहून अधिक रेशीम पैदा होत असतें. ह्या आवश्यक कार्यांत म्हैसूर सरकार साहजिकच अधिक लक्ष घालीत आहे. हा उद्योग आघाडीवर कायम ठेवण्यास म्हैसुरांत त्यांनी फिलेचर यूनिटची स्थापना केली असून त्यामुळें म्हैसुरी रेशमाची प्रतिष्ठा वाढली आहे. सरकारानें ह्या कंपनीला फिलेचर्सची सुरुवात करण्याकरितां भरपूर आणि बहुमोल सवलत दिल्याचें नमूद आहे. भागांच्या रूपानें १५,००० रुपयांच्या भांडवलाबरोबरच म्हैसूर येथील गव्हर्मेंट फिलेचर यूनिट कंपनीला बहाल करण्याची सवलत देण्यांत आलेली आहे. सेरिकल्चरल डिपार्टमेंटचें सहकार्य सर्वतोपरी कंपनीला लाभणार असून सरकारानें आपला एक अधिकारी नियामक मंडळावर नेमून दिला आहे. हिशेब तपासण्याच्या बाबतींतहि कंपनीला सहाय मिळणार आहे. ह्याच प्रदेशांत इतरांना अशा सवलती मिळणार नसल्याचें सरकारानें जाहीर केलें आहे. फिलेचर्समधून झालेली सर्वच्या सर्व पैदास तावडतोब खपून जाण्यास वाव आहे. वास्तविक देशी पैदाशीशी तुलना करतां उंची दर्जाच्या रेशमाला हिंदुस्थानभर एवढी जबर मागणी आहे कीं, २० लक्ष पौंड परदेशी फिलेचर सिल्क सध्या गत्यंतर नाहीं म्हणून आयात होत आहे. म्हणून ह्या धंद्याचें विस्तीर्ण क्षेत्र कंपनीस मोकळें असून सध्याचाच काय पण आणखी युनिटस वाढवल्यास त्यांचाहि माल हातोहात खपेल अशी अपेक्षा आहे.

म्हैसूर संस्थानाच्या देखरेखीनें व सहायानें चालविण्यांत येणाऱ्या वरील कारखान्याचा व्यवहार यशस्वी व किफायतशीर होईल ह्याविषयीं शंका बाळगण्याचें कारण नाहीं. केवळ डिविडंडचे दृष्टीनें कंपनींत भांडवल घालणें श्रेयस्कर ठरेलच पण त्याबरोबरच एका कर्तृत्ववान महाराष्ट्रीय कारखानदारास महाराष्ट्रांतून भांडवल मिळणें जास्त उचित होईल. कंपनीच्या भागांस उत्कृष्ट मागणी असल्यानें, पैसे गुंतविणारांनीं तिच्या किफायतशीरपणाची खात्री करून घेऊन भागांसाठी मागणी त्वरेनें न केल्यास, मागाहून ते मिळणें कठीण होण्याचा संभव आहे. ता. २६ जानेवारी रोजीं भाग विक्री सुरू झाली आहे व भांडवल जमताक्षणींच अर्ज घेण्याचें सूचनेशिवाय बंद करण्यांत येईल.

## अल्प प्रारंभ, अवाढव्य विस्तार

अमेरिकेंतील वूलवर्थची वस्तुभांडारें ( स्टोअर्स ) विख्यात आहेत. त्यांचें विस्तृत जाळें पसरलेलें आहे आणि त्यांची उलाढाल कोटि रुपयांत मोजावी लागते. ह्या प्रचंड धंद्याच्या प्रारंभाची मनोरंजक माहिती 'एव्हरिबडीज' नांवाच्या इंग्रजी साप्ताहिकांत एका लेखकानें दिली आहे. ह्या धंद्याचा उत्पादक शेतावर जन्मास आला होता आणि त्याचें जीवन अत्यंत कष्टमय होतें. परंतु तो काटक व काटकसरी होता. गरीबींत दिवस कंठल्यामुळें सामान्य स्थितींतल्या लोकांस नित्याच्या कौटुंबिक गरजांसाठी लागणारे जिन्नस स्वस्त मिळाले पाहिजेत असें त्याच्या मनानें घेतलें. तो न्यूयॉर्क शहरांतील एका वस्त्रभांडारांत नोकरीस राहिला आणि त्याच्या मालकानें लहानसें दुकान थाटण्यास त्यास सहाय केलें. पण त्याचें बस्तान बसलें नाहीं म्हणून त्यानें अन्य ठिकाणीं दुसरें दुकान काढलें. तिसऱ्या ठिकाणीं काढलेलें दुकान फसलें परंतु चवथ्यांत त्याला यश आलें. यशापयशाचें रहाटगाडगें ह्याप्रमाणें फिरत असतां त्यानें धीर सचूं दिला नाहीं आणि नवीन दुकानें काढण्याचा क्रम चालू ठेवला. बारा वर्षांच्या अवधींत फ्रँक वूलवर्थच्या वस्तुभांडारांची संख्या बारा झाली आणि पुढच्या चवदा वर्षांत त्यास एवढा फायदा मिळूं लागला कीं आपल्या धंद्याची अडीच कोटि रुपये भांडवलाची त्यानें मंडळी उभारली. ह्या कंपनीस एवढा नफा होऊं लागला कीं महायुद्धाच्या काळांत न्यूयॉर्क शहरांत तीन कोटि रुपये किंमतीचा टोलेजंग गगनचुंबित वूलवर्थ प्रासाद तिनें उभारला. ह्या गृहस्थाची नात आज जगांत अत्यंत श्रीमंत गणली जाते आणि तिची संपत्ति सात ते दहा कोटि रुपये आहे असें म्हणतात. वूलवर्थच्या चिकाटीचें व धैर्याचें उदाहरण अनुकरणीय आहे.

## स्फुट विचार

### रिझर्व्ह बँकेचा २८ लक्ष रुपये नफा

गेल्या डिसेंबर अखेरच्या वर्षांत रिझर्व्ह बँकेस सर्व खर्चवेच वजा जाऊन २७,९२,२०० रुपये इतका निवळ नफा उरला. बँकेच्या कायद्यास अनुसरून गव्हर्नर जनरल इन कौन्सिल ह्यांनीं ३॥ टक्के वार्षिक डिव्हिडंड निश्चित केलें आहे, त्याप्रीत्यर्थ ह्या नफ्यामधून रकम वजा होतां १०,४१,२०० रुपये शिल्लक रहातील, ते सरकारच्या तिजोरींत त्याच कायद्याप्रमाणें जमा केले जातील. रिझर्व्ह बँकेचे भाग शक्य तितक्या विस्तृत समाजाच्या हातीं जाऊन अनेक लोकांस मतदानाचा हक्क उपभोगतां यावा ह्या मूळ उद्देशाच्या मार्गांत अडचणी उपस्थित झाल्या असून थोड्या जणांच्या हातांत बँकेचे भाग एकत्रित होण्याची प्रवृत्ति बळावत आहे. पांच भाग धारण करणारास प्रत्येकीं एक मत कायद्यानें दिलें असून अधिकांत अधिक दहा मतें कोणासहि देतां येतात अशी व्यवस्था आहे. थोड्या लोकांनीं बँकेचे शेअर्स घेतल्यानें मताचें क्षेत्र आकुंचित होतें. कोणत्याहि एका व्यक्तीच्या नांवावर दोनशां-पेक्षां अधिक भाग असूं नयेत असा नियम करण्याची आवश्यकता बँकेच्या डायरेक्टरांनीं सरकारास सुचविली आहे. बँकेस स्वतःच्या चलनी नोटा काढण्याचा अधिकार आहे. परंतु पूर्वीच्या सरकारी नोटा आज प्रचलित आहेत, त्यांचा पुरवठा कमी होईपर्यंत रिझर्व्ह बँक ह्या अधिकाराची अंमलबजावणी करणार नाहीं. नवीन नोटा पांच-सहा महिन्यांत बाहेर येतील असा अंदाज आहे. रिझर्व्ह बँकेस जोडलेल्या बँकांची संख्या ५० ची ५४ झाली आहे ह्यावरून त्यांस मध्यवर्ती बँकेची उपयुक्तता पटलेली दिसत आहे. रिझर्व्ह बँकेस गेल्या वर्षी १ कोटि २७ लक्ष रुपये उत्पन्न झालें आणि नोकर व कचेऱ्या ह्यांचाच खर्च सुमारें ३५ लक्ष रुपये झाला.

---

### मुंबईच्या रोखे-बाजाराची घडी नीट केव्हां बसणार ?

उद्योगधंद्यांत भांडवल घातलें जाऊन त्यांचा उत्कर्ष व्हावा एवढ्यासाठीं औद्योगिक मंडळ्यांच्या भागांची खरेदी-विक्रीची उलाढाल चालणें आवश्यक असतें आणि त्या व्यवहारांत पद्धतशीरपणा व नियमबद्धता असावी म्हणून रोखे-बाजाराच्या संस्था संघटित रीतीनें कार्य करीत असतात. सरकारनें सामान्यतः मान्य केलेल्या नियमांस अनुसरून ह्या संस्थांचे सभासद स्वतंत्रपणानें कारभार पहातात आणि रोख्यांच्या देवघेवीवर नजर ठेवतात. मागणी-पुरवठ्याचा मेळ घालण्याचा धंदा दलाल करतात आणि तेच रोखे-बाजाराच्या संस्थेचे सभासद व चालक असतात. बाजारांत वायद्याच्या खरेदी-विक्रीचे सौदे करणारे धंदेवाले दलालांचे मार्फत व्यवहार करतात. त्यांच्या खरेदी-विक्रीचा परिणाम रोखे व भाग ह्यांच्या किंमतींवर होत असतो. योग्य मर्यादेंत हे सौदे व देवघेव झाल्यास रोख्यांच्या किंमती सामान्यतः स्थिर रहाण्यास सहाय होतें. सट्ट्यांचा ह्या प्रकारचा उपयोग होतो ही गोष्ट शास्त्रीयरीत्या मान्य झालेली आहे. परंतु सट्टे भरमसाट झाले असतां त्यांचा दुष्परिणाम सर्व जनतेस भोगावा लागून रोखे-बाजाराचा मूळ उद्देश विफल होतो. अलीकडे मुंबईच्या शेअरबाजारांत भागांचे बाजारभाव विशिष्ट परिस्थितीमुळें एकदम कोसळले आणि त्याच्या नियामकमंडळास मध्यें पडून सौद्यांचे व्यवहार बंद ठेवावे लागले. अशा गोष्टी वारंवार होऊं लागल्यानें रोख्यांत व भागांत पैसे गुंतवणाऱ्या बिनधंदेवाल्या जनतेच्या मनांत अस्थिरता उत्पन्न होणें स्वाभाविक आहे. ही गोष्ट रोखे-बाजाराच्या किंवा समाजाच्या हिताची खास नाहीं. सरकारनें आणि बाहेरच्या लोकांनीं आपल्या अंतर्व्यवस्थेंत हात घालूं नये असें म्हणणाऱ्या रोखे-बाजाराच्या चालकांनीं व त्यांतल्या धंदेवाल्यांनीं ह्या बाबतींतली स्वतःवरची जबाबदारी ओळखली पाहिजे. व्यवस्थेंतले दोष त्यांस दूर करतां आले नाहींत तर जनतेच्या हिताच्या दृष्टीनें तिचें नियंत्रण करण्याचें काम सरकारावर सहजच येऊन पडतें. दलाल व धंदेवाले ह्यांनीं आपले व्यवहार सुयंत्र चालतील अशी पक्की खबरदारी घेतली पाहिजे; नाहीं तर वायद्याचे सवदे अजीबात बंद करून केवळ रोखीचे व्यवहार तेवढे चालू ठेवावे म्हणजे किंमतींतल्या फरकाच्या देण्याघेण्याची भानगडच नाहींशी होईल, ही सूचना अमलांत येण्याचा विचार सरकारास व जनतेस करावा लागेल.

---

### नवीन कायदे—मराठा चेंबरचा अभिप्राय

सावकारी व्यवहारांचें नियमन आणि मर्यादित शेतमालकांच्या कर्जवसुलीची तहकुबी ह्या दोन बाबींसंबंधानें मुंबईच्या प्रधानमंडळानें कायद्यांचे मसुदे प्रांतिक विधिमंडळास गेल्या आठवड्यांत सादर केले. त्यांविषयीं आपला अभिप्राय येथील मराठा चेंबर ऑफ कॉमर्सनें सरकारास कळवला आहे. शेतकरीवर्गाच्या आर्थिक अडचणी दूर करण्यासाठीं योग्य उपायांची अंमलबजावणी ह्या पूर्वीच व्हावयास हवी होती. तो प्रश्न काँग्रेस-मंत्रिमंडळानें व्यापक स्वरूपांत हातीं घेतल्याबद्दल चेंबरनें समाधान व्यक्त केलें असून त्यांतलें तत्त्व व कायद्यांचें सामान्य स्वरूप ह्यांस स्थूल मानाचा पाठिंबा दिला आहे. गरीब व अशिक्षित वर्गांचें हित साधण्याच्या हेतूनें करावयाच्या कायद्याचे परिणाम दूरगामी होण्याचा संभव असल्यानें ते कोणत्याहि इतर वर्गास निष्कारण बाधक होऊन शेवटीं उद्दिष्ट हेतु सफल होण्याच्या मार्गांत येणार नाहींत ह्याविषयीं काळजी घेण्याची सूचना चेंबरनें सरकारास केली आहे. सावकारी व्यवहारांचें नियंत्रण होणें अगत्याचें आहे. तथापि, त्याविषयींच्या कायद्याची रचना व अंमलबजावणी अशी व्हावी कीं, अडाणी ऋणकोंस नागवणारे जुलमी सावकार निसटूं नयेत आणि प्रामाणिकपणानें धंदा करणारांच्या व्यवहारांवर गदा येऊं नये असें चेंबरनें म्हटलें आहे. कर्जफेडीच्या तहकुबीची तरतूद मर्यादित मुदतीपुरती बिलामध्यें केली आहे तिला चेंबरची मान्यता आहे आणि जमिनीच्या क्षेत्राच्या मर्यादा त्यांत दिल्या आहेत त्या पुरेशा आहेत असा अभिप्राय तिनें व्यक्त केला आहे.

---

### गोसंवर्धन-दिनानिमित्त सभा

महाराष्ट्र गोसंवर्धन प्रातिनिधिक मंडळातर्फे गेल्या रविवारीं पुणें येथें गोखले स्मारक मंदिरांत कांहीं निमंत्रित गृहस्थांची सभा गोवर्धन दिनानिमित्त भरली होती. रा. ब. सहस्रबुद्धे सभेचे अध्यक्ष होते आणि श्री. ल. ब. भोपटकर, श्री. न. गं. आपटे, श्री. स.रा. पारंदे, प्रो. काळे, श्री. ल. र. गोखले व श्री. पर्वते यांचीं गोसंवर्धन मंडळानें तयार केलेल्या योजनेस उद्देशून भाषणें झालीं. डॉ. राइट ह्या तज्ज्ञांनीं हिंदुस्थान सरकारास केलेल्या रिपोर्टाच्या आधारें ही योजना आखली असून सरकारानें कोणत्या गोष्टी कृतींत आणल्या पाहिजेत ह्याचें दिग्दर्शन तिच्यामध्यें केलेलें

आहे. गाईच्या दुधाचें आहारांत महत्त्व, गाई व बैल ह्यांचें शेतीच्या धंद्यांत स्थान, गुरांच्या चाऱ्याबाबत भासणारी अडचण, गोसंवर्धनाच्या मार्गातले अडथळे व ते दूर होण्याचे उपाय इत्यादि मुद्यांवर वक्त्यांचीं भाषणें झालीं. सरकाराकडे पाठवावयाच्या योजनेस सभेनें सर्व सामान्य रीतीनें मान्यता दिली आणि गोसंवर्धन प्रातिनिधिक मंडळानें त्यासंबंधांत जरूर ती व्यवस्था करावी असा अभिप्राय सभेनें व्यक्त केला.

## झारापकर टेलरिंग कॉलेज

### सरकारी परीक्षेचा निकाल

येथील सुप्रसिद्ध झारापकर टेलरिंग कॉलेजमधून मुंबई सरकारच्या औद्योगिक खात्यामार्फत झालेल्या सरकारी परीक्षेला पुढील आठ विद्यार्थी बसले होते. ते सर्व अत्यंत यशस्वी रीतीनें उत्तीर्ण होऊन कॉलेजचा शे. १०० टक्के पास असा निकाल लागला हें कॉलेजला अत्यंत भूषणावह आहे.

१ पटेल हरिदास पुंजीराम, अहमदाबाद.
२ पटेल माणेकलाल हरिदास, अहमदाबाद.
३ शुक्ल गिरजाशंकर शामलाल, कानपूर
४ सौ. कुलकर्णी शांताबाई गोविंद, इसलामपूर.
५ कुडाळकर दत्तात्रय कृष्ण, इचलकरंजी.
६ श्रीमती कुलकर्णी गोंदूबाई, अहमदनगर
७ आजेरेकर सच्चिदानंद नरहर, बेळगांव
८ भणगे कृष्णाजी शंकर, पुणें.

### बॅ. जमनादास मेहता सुवर्णपदक

वरील विद्यार्थ्यांमध्यें श्री. पटेल हरिदास पुंजीराम हे पहिल्या वर्गात पहिले आले असल्यामुळें त्यांना ह्या वर्षाचें बॅ. जमनादास मेहता सुवर्णपदक मिळविण्याचा बहुमान मिळाला आहे हें त्यांना भूषणावह आहे.

### श्रीमंत इचलकरंजीकरांकडून देणगी


वरील विद्यार्थ्यांपैकीं श्री. कुडाळकर दत्तात्रय कृष्ण ह्या विद्यार्थ्याला इचलकरंजीचे राजेसाहेब श्रीमंत बाबासाहेब घोरपडे यांनीं पाठविलें होतें. सदरहु विद्यार्थी सरकारी परीक्षेंत यशस्वी रीतीनें उत्तीर्ण झाल्यामुळें श्रीमंतांनीं कॉलेजला २५ रुपयांची देणगी दिली आहे. गेल्या वर्षी दुसऱ्या एका विद्यार्थ्याच्या उत्कृष्ट शिक्षणाबद्दल श्रीमंतांनीं ७५ रु. देणगी दिली होती.

### सोसायटीचें दप्तर *

प्राथमिक पतपेढ्यांच्या चिटणिसांना आपल्या प्रत्यक्ष कामांत मार्गदर्शक होईल अशी माहिती देणारें वाङ्मय मराठींत उपलब्ध नाहीं. ही उणीव भरून काढण्याकरितां श्री. दगाजी अजबा पाटील, सुपरवायझर, सटाणा तालुका को. सु. यूनियन, ह्यांनीं लिहिलें आहे. अनेक पतपेढ्यांचे सेक्रेटरी दक्ष व माहितगार नसतात व शेतकरी सभासदहि निरक्षर असतात. सोसायट्यांचे व्यवहार सुव्यवस्थित चालण्यास दप्तर काळजीपूर्वक ठेवण्याची फार आवश्यकता असते हें उघड आहे. श्री. पाटील ह्यांनीं आपल्या पुस्तकांत, सोसायट्यांनीं बाळगावयाचीं बुकें व रजिस्टरें ह्यांची यादी प्रथम देऊन प्रत्येकाविषयीं तपशीलवार व सुबोध सूचना केल्या आहेत. फायली, सेक्रेटरींनीं ठेवावयाची डायरी इत्यादींविषयींहि पुस्तकांत उपयुक्त माहिती आहे. श्री. धर्माजी तानाजी पाटील, प्रेसिडेंट, सटाणा यूनियन, ह्यांनीं पुस्तकास प्रस्तावना लिहिली आहे, तींत त्यांनीं म्हटल्याप्रमाणें नवशिक्या सेक्रेटरीचा तर हें पुस्तक मित्रच होऊन बसेल व चांगल्या सेक्रेटरींना बुचकळ्यांत पाडणाऱ्या शंकांचें निरसनहि करील. पुस्तक प्रत्येक पतपेढीच्या संग्रहीं असणें अगत्याचें आहे.

* "सोसायटीचें दप्तर" पृ. २०. किं. ४ आणे.



टिळक आयर्न ॲंड स्टील वर्क्स
[ सर्व प्रकारचें स्टील स्ट्रक्चरल वर्क (काम) तयार करतात. ]
मो. मु. टिळक
प्रो. मेकॅनिकल इंजीनिअर.

दि साउंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.
[ स्थापना सन १९१५ ]
९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर
कामाची वेळ:—
दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १
चालू ठेवी द. सा. द. शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.
सेविंग्ज बँक ठेवींवर द. सा. द. शें. ३ टक्के व्याज दिलें जातें.
मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.
कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.
मॅनेजिंग एजंटस्.

स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा
स्वदेशी धंद्यांना उत्तेजन देऊन त्यांची योग्य [illegible] करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु. २४, किंवा प्रथम ६८ व दरमहा १ [illegible] पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज, अगर [illegible] असल्यास रु. ५ ते १०० रोख मिळवा. [illegible] घेऊन निकडीच्या गरजा भागवा. या [illegible] रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि [illegible] प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठी २ आण्याचीं तिकिटें [illegible] अगर भेटा.
दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.
हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई.
ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं. २.

## चांदीच्या बाजाराची चमत्कारिक स्थिति

वार्षिक उत्पादन व मागणी ह्यांच्या परस्पर-संबंधावर कोणत्याहि मालांचा जागतिक बाजारभाव अवलंबून राहणें स्वाभाविक आहे. चांदीच्या बाजाराची स्थिति मात्र विलक्षण आहे. ह्या धातूच्या बाजारभावाची गुरुकिल्ली अमेरिकन सरकारच्या हातांत आहे. अमेरिकन खाणींमधून चांदी निघते ती स्वस्त होऊन तिच्या संबंधांतल्या धंद्याचें नुकसान होऊं नये म्हणून तेथील सरकारानें ह्या मालाची खरेदीची किंमत ठरवून टाकली आहे आणि त्या भावानें सरकार खरेदी करण्यास तयार असतें. कॅनडा, मेक्सिको वगैरे देशांमधून येणाऱ्या चांदीचीहि किंमत निश्चित करण्यांत आली असून ती अमेरिकन चांदीच्या मानानें कमी आहे. सरकारनें खरेदी केलेली चांदी अमेरिकन चलनास तारण म्हणून संग्रहांत ठेवण्यांत येते. जगांत चांदीचा उपयोग दागदागिने करणें व नाणीं पाडणें ह्यांकडे होतो. अमेरिकन सरकार मात्र चांदीची सांठवणच करतें. चांदीच्या खाणीचे मालक आपल्या मालाची किंमत सरकारकडून चोपून घेतात. ती अलीकडे कमी करण्यांत आल्यानें चांदीच्या बाजारभावांत काय बदल होतो, इकडे धंदेवाल्यांचें लक्ष लागलें होतें. अमेरिकेंतली चांदीची अंतर्गत किंमत दर औंसास ७७ सेंट्स होती, ती ६४ सेंट्स करण्यांत आली असली तरी बाहेरून येणाऱ्या चांदीचा भाव दर औंसास ४४ सेंट्स ह्या सुमारास कायम राखण्यांत येतो. ह्या कारणानें जागतिक बाजारभावांत थोडें-बहुत स्थैर्य निर्माण झालें आहे. कॅनडा, मेक्सिको व चीन ह्या देशांशीं झालेल्या करारांमुळें हें स्थैर्य टिकूं शकेल असें मानण्यास जागा आहे.

तथापि, चांदीचा बाजारभाव अमेरिकन सरकारच्या धोरणावर सर्वस्वीं अवलंबून असल्यानें त्याचे विषयीं शाश्वती वाटत नाहींशी झाली आहे. तें सरकार कृत्रिम रीतीनें चांदीचे भाव उचलून धरीत आहे. ह्यामुळें मागणी-पुरवठ्याच्या स्वाभाविक व्यवहारास मोकळा वाव मिळूं शकत नाहीं आणि चांदीच्या आगामी किंमतीविषयीं अंदाज करतां येत नाहीं. सध्या जगांतील पुष्कळशा चांदीचा प्रवाह अमेरिकन संग्रहाकडे चालला आहे आणि त्या मधून प्रवाह केव्हां परतेल हें सांगतां येत नाहीं. चीन देशास आज द्रव्याची तीव्र नड भासत असल्यानें पुष्कळ चिनी चांदीची निर्गत अमेरिकेंत होत आहे. अमेरिका तरी चांदी कोठवर सांठवणार हा प्रश्नच आहे. ह्या राष्ट्राच्या सरकारी तिजोरींत २२० कोटि औंस इतकी चांदी जमा झाली आहे. तिची किंमत सरकारी टांकसाळीच्या भावानें ७०० कोटि रुपयांच्यावर होते. सरकारी गंगाजळी-सोन्याची किंमत सुमारें ३,१६८ कोटि रुपये भरते. कायद्याप्रमाणें चांदी व सोनें ह्यांच्या निधींचें परस्परप्रमाण १:३ ह्याप्रमाणें असलें पाहिजे, म्हणजे आणखी सुमारें १०७ कोटि औंस चांदीस सरकारी संग्रहांत जागा आहे. ही मर्यादा विस्तृत आहे हें खरें; तथापि, चांदीच्या संग्रहांत सारखी भर पडत आहे आणि सोन्याचा निधी हळुहळु कमी होत आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. मुंबईस चांदीचा बाजार फार मोठा आहे आणि हिंदुस्थान देश चांदीचें चांगलें गिऱ्हाईक आहे. भावाच्या फेरबदलास अनुसरून परदेशांशीं हिंदुस्थानच्या आयात-निर्गतीचा चांदीचा व्यापार सारखा चाललेला असतो. इंग्लंड व अमेरिका येथील बाजाराच्या परिस्थितीकडे हिंदी व्यापाऱ्यांचे डोळे सारखे लागलेले असतात. मुंबईस चांदीचा भाव शंभर तोळ्यांस ५० रुपये ह्या सुमारांत अलीकडे टिकला आहे.

---

## सावकारी-नियंत्रण बिल

### प्रो. काळे यांचें भाषण

गेल्या शुक्रवारीं पुणें येथें मोतीचौकाशेजारी श्री. टापरे यांचे दिवाणखान्यांत सराफ असोसिएशनची सभा भरली होती. तीमध्यें, सध्या प्रांतिक विधिमंडळापुढें असलेल्या सावकारी व्यवहारांच्या नियंत्रणाबाबतच्या कायद्याच्या मसुद्याची माहिती प्रो. काळे यांनीं दिली आणि भाषणानंतर श्रोत्यांनीं विचारलेल्या प्रश्नांविषयीं खुलासाहि केला. प्रो. काळे ह्यांच्या भाषणाचा गोषवारा येथें दिला आहे:—

( १ ) आर्थिक प्रश्नांसंबंधानें आमच्या समाजांत शोचनीय अनास्था आहे. प्रत्यक्ष व्यापारांत पडलेल्या मंडळीस आर्थिक घडामोडींच्या ज्ञानाचें महत्त्व वाटत नाहीं आणि रोज येणारा दिवस कसा तरी ढकलण्यांत ती गुंतलेली असते. सुशिक्षित व पांढरपेशा वर्गाचा व्यापाराशीं संबंध येत नाहीं आणि म्हणून त्याचें आर्थिक व्यवहाराकडे लक्ष नाहीं. "अर्थ" साप्ताहिकाच्या अनुभवावरून ही अनास्था स्पष्टपणें प्रतीत होते.

( २ ) सावकारी बिलाचा विचार महाराष्ट्रीय व्यापाऱ्यांनीं ह्या पूर्वीच करावयास हवा होता. मराठा चेंबरनें ह्या बाबतींत आपला अभिप्राय सरकारास कळवला आहे.

( ३ ) बँकिंग इनक्वायरी कमिट्यांनीं अडाणी व निरक्षर जनतेच्या संरक्षणासाठी सावकारी व्यवहारांचें नियमन होण्याची आवश्यकता प्रतिपादली होती. त्याप्रमाणें कित्येक प्रांतांत कायदेहि झाले आहेत.

( ४ ) सावकारी व्यवहार हें वास्तविक पहातां समाजोपयोगी कार्य आहे. परंतु कित्येक सावकार गरीब व अडाणी लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांस लुबाडतात असा अनुभव आहे. ह्या नागवणुकीस आळा घालणें अगत्याचें असून त्या हेतूनेंच प्रांतिक कायदेमंडळांत बिल सरकारनें आणलें आहे.

( ५ ) सावकारी करणारांवर सरकारी यादींत नांव नोंदवून परवाना काढणें, कुळांस पावत्या व खाते उतारे देणें, हिशेब नीट ठेवणें, कायद्यानें ठरवलेल्या दरापेक्षां अधिक व्याज न घेणें, ठरलेल्या हद्दींतच व्यवहार करणें, दामदुपटीचा नियम पाळणें इत्यादि निर्बंध बिलानें घातले आहेत.

( ६ ) दुष्ट सावकारांचें नियंत्रण व्हावें, पण समाजोपयोगी सावकारांचे व्यवहार नीट चालावे अशी खबरदारी येथें घेण्यांत आली पाहिजे.

( ७ ) ह्या विषयींच्या अडचणी कायदेमंडळाच्या निदर्शनास आणून योग्य त्या दुरुस्त्या बिलांत घडवून आणण्याचा प्रयत्न होणें जरूर आहे.

( ८ ) बिलाच्या मुळभूत तत्वास मान्यता देऊन त्यांतले व्यावहारिक दोष दूर करण्याची खटपट अवश्य झाली पाहिजे.

( ९ ) आमच्या व्यवहारास कायद्याचें नियंत्रणच नको असें सावकारांनीं म्हणून चालणार नाहीं. त्याचप्रमाणें, सावकारी धंदा बुडण्यांत ज्याचा परिणाम होईल असा अदूरदर्शी कायदा करणेंहि अनिष्ट ठरेल.

# दि ब्लॉसम मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लि०

## अधिकृत आणि काढलेलें भांडवल १ लक्ष रुपये

**दोन प्रकारच्या भागांत वांटलेलें आहे.**

( १ ) २,००० ऑर्डिनरी, प्रत्येकी २५ रु. प्रमाणें.
( २ ) २,००० ५ टक्के दराचे क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स, प्रत्येकीं २५ रु. प्रमाणें.
अर्जाबरोबर १० रु. व अलॉटमेंटबरोबर ५ रु. बाकीचे १० रु. अलॉटमेंटपासून सहा महिन्यांच्या आंत मागितले जाणार नाहींत.

## डायरेक्टर्स

१ श्री. जी. व्ही. साळवेकर बी. ए. ( टिळक ), मालक, सरदारगृह, मुंबई.
२ श्री. एल. के. रानडे, पुणें.
३ श्री. बी. व्ही. तांबे, मालक, तांबे आरोग्यभुवन, मुंबई.
४ प्रो. व्ही. वाय. कोल्हटकर, एम. कॉम. ( मुं. ) एम. एससी. ( लंडन ).
५ श्री. जी. व्ही. पटवर्धन बी. ए. ( टिळक ), चीफ एजंट, कॉमनवेल्थ विमा कंपनी.
६ श्री. के. व्ही. साने, एंजिनिअर व कॉंट्रॅक्टर.
७ बी. पी. सहस्रबुद्धे, ( एक्स ऑफिशिओ ).

## बँकर्स

१ दि बॉंबे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक, लि. मुंबई.
२ सेंट्रल बँक ऑफ इंडिया, लि. मुंबई.
३ बँक ऑफ महाराष्ट्र लि., पुणें शहर.
४ दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक, लि. पुणें शहर.

## ऑडिटर्स

बी. सी. अभ्यंकर अँड कं., रजिस्टर्ड ऑडिटर्स अँड अकौंटंट्स, २३९ ए, गिरगांव रोड, मुंबई.

## सॉलिसिटर्स

मेसर्स दिवेकर अँड को. मुंबई.

## मॅनेजिंग एजंट्स

मेसर्स इंडस्ट्रिअल सर्व्हिस, लि.


## कंपनीचें रजिस्टर्ड ऑफिस :

**२३९ ए, गिरगांव रोड, मुंबई.**

## ब्लॉसम मॅन्युफॅक्चरिंग कं. लि.

श्री. भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे ह्यांनीं नोकरी सोडून कारखानदारी कशी पत्करली, गव्हाच्या पोह्यांशीं त्यांचा परिचय कसा झाला, पोहे बनविण्यासाठी त्यांनीं यंत्र कसें योजिलें, इत्यादि माहिती 'अर्था 'च्या ता. २४ मार्च, १९३७ च्या अंकांत आलेली आहे. त्यांच्या पोह्यांचा उच्च दर्जा डॉ. जोन्स सारख्यांनींहि मान्य केला असून हे पोहे मिरज येथील इस्पितळांत उपयोगांत आणले जात आहेत. माल तयार करण्याची कला साध्य झाल्यानंतर श्री. सहस्रबुद्धे ह्यांनीं आपलें लक्ष त्याच्या उठावाकडे वळविलें व आर्ता वाढत्या व्यापास वाव मिळावा म्हणून त्यांनीं आपल्या कारखान्याचें ' ब्लॉसम मॅन्युफॅक्चरिंग ' कंपनींत रूपांतर केलें आहे.

गव्हाच्या पोह्यांचे कारखानदार



श्री. भा. पां. सहस्रबुद्धे

वरील कंपनीचें अधिकृत भांडवल एक लक्ष रुपयांचें असून तें ऑर्डिनरी व क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स भागांत विभागलेलें आहे. प्रत्येक भाग २५ रुपयांचा आहे व प्रेफरन्स भागांवर ५ टक्के दरानें डिव्हिडंड अग्रहक्कानें मिळणार आहे. मुंबई येथील सरदार गृहाचे मालक, श्री. जी. व्ही. साळवेकर, हे कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाचे अध्यक्ष असून मेसर्स इंडस्ट्रियल सर्व्हिस लिमिटेड ह्या खासगी लिमिटेड कंपनीकडे मॅनेजिंग एजन्सी आहे. श्री. सहस्रबुद्धे ह्यांच्या गव्हाच्या पोह्यांस वाढती मागणी असल्यानें कंपनीचा कारभार किफायतशीर होऊन भागीदारांस चांगलें डिव्हिडंड सुटेल, अशी अपेक्षा आहे.

### रोखे-बाजार आणि मुंबई सरकार

मुंबईच्या रोखे-बाजारांत किंमती कोसळल्यानें त्यासंबंधांत नियंत्रण करण्याची व्यवस्था सरकारकडून होणें इष्ट आहे, ह्या लोकमताचा प्रतिध्वनि प्रांतिक विधिमंडळांत गेल्या सोमवारीं उठला. बाजारभाव खालीं आले ह्यास जागतिक कारणें असून पाश्चात्य राष्ट्रांमध्येंहि तशीच परिस्थिति निर्माण झाली आहे, असें स्पष्टीकरण अर्थमंत्री, श्री. लठ्ठे ह्यांनीं केलें. तथापि, मुंबई रोखे-बाजाराच्या संचालकमंडळानें आपल्या नियमांची अंमलबजावणी कडक रीतीनें करून त्यांचें उल्लंघन करणाऱ्या दलालांचा योग्य समाचार घ्यावा असें सरकारनें मंडळाच्या अध्यक्षास सुचविलें आहे आणि मॉरिसन कमिटीनें बाजाराच्या व्यवस्थेंत सुधारणा होण्याविषयीं शिफारसी केल्या आहेत त्यांचा विचार चालू आहे असें आश्वासन अर्थमंत्र्यांनीं विधिमंडळांत दिलें.


## जाहीर नोटीस.

### औंध स्टेट सेंट्रल बँक लि. औंध

शाखाः—आटपाडी, कुंडल, गुणदाळ, बिचूद, दिघंची.
आम्ही मुदतठेवी खालील व्याजाचे दरानें स्वीकारतों :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मुदत | १ | वर्ष | द. द. | २ | टक्के. |
| ” ” | २ | ” | ” ” | २॥ | टक्के. |
| ” ” | ३ | ” | ” ” | ३ | टक्के. |
| ” ” | ४ | ” | ” ” | ३॥ | टक्के. |
| ” ” | ५ | ” | ” ” | ४ | टक्के. |

औंध, ( जि. सातारा )
ता. २०-१-३८.

वी. आर. वर्तक,
मॅनेजर.

## न्यू इंडिया ॲशुअरन्स कं. लि. मुंबई

( सर्व तऱ्हेचें विमा काम करणारी हिंदुस्थानांतील सर्वांत मोठी कंपनी. )

आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यतः खालील तीन गोष्टींकडे लक्ष देतोः—
(१) कंपनीचें स्थैर्य. ( २ ) उत्तम व्यवस्था.
(३) पॉलिसींमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता.
“ न्यू इंडिया ” ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल.
प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या.

श्री. डी. के. जोगळेकर, बी. ए.,
ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज,
टिळक रोड, पुणें ( २ )



एच. एच. दि छत्रपति महाराजा
ऑफ कोल्हापूर यांचे आश्रयाखालील
जाधव कॉलेज ऑफ
## टेलरिंग ॲन्ड कटिंग
जानेवारीपासून नवीन वर्ग सुरू झाले. नांवें नोंदवा.
नवीन माहितीपत्रक मागवा. ४९७ बुधवार, पुणें.

## ऑफिस सुपारी—
आपल्या कुटुंबांत आरोग्य-दायक, भरपूर मसाल्याची, 'स्वादिष्ट सुपारी ' वापरा. बिनकिडकी सुपारी व निर्भेळ मसाला वापरल्याबद्दल खात्री करा.

म. गो. कुळकर्णी आणि मंडळी,
किराणा दुकानः—पुष्करणी चौक, सदाशिव, पुणें २

## अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वमान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

SAHYADRI INS.Co
NASIK
BEST TO CHOOSE & TO REPRESENT
WANTED WORKERS OF EITHER SEX.
Particulars by post or in person.

## शेअर बाजारांतील किंमती

शेअर बाजारांत ज्यांची देवघेव चालते असे रोखे व भाग ह्यांच्या किंमती मुंबईंत अलीकडे बऱ्याच उतरल्या आहेत. घट होण्याची ही प्रवृत्ति ब्रिटिश रोखे-बाजारासंबंधानेंहि दिसून येते. लंडन स्टॉक एक्सचेंजमधील ३६५ रोखे व भाग ह्यांच्या किंमतींची तुलना केल्यास असें आढळतें कीं, १९३६ च्या डिसेंबर महिन्यांत त्यांची एकूण किंमत ७३९ कोटि पौंड होती, ती १९३७ च्या त्याच महिन्यांत ६७३ कोटि पौंड झाली. ह्या आकड्यांवरून रोखे व भाग ह्यांच्या बाजारभावांत गेल्या वर्षी केवढ्या मोठ्या प्रमाणांत घटती झाली, ह्याची स्पष्ट कल्पना येईल; तसाच प्रकार हिंदुस्थानांतील रोखे बाजाराचे बाबतींत झालेला आहे.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११९–१४ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन ... ... ... | १०४–१४ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८– ६ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९८–११ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०६—४ |
| ३¾% १९४८–५२ ... ... ... | १००—४ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) ... | ११०—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षं मुदत ) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... .. | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) १०% ... ... | १४९—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११८—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ६% ... | ३२—८ |
| इंपीरिअल बँक ( ५० ) १२% ... ... | १५७१—४ |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% ... ... | ५८—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १२०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४¾% ... ... | १०४—४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९६—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १०% व ६ रु. ४ आ. बोनस | ९२०—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७५२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | ११७–१३ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१६—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३२०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १४२०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | १५६—४ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४७—८ |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २३—४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ४ आ. ... | ४१—१२ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ७५ रु. बोनस ... | ४,३१०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०३–१२ |
| टाटा आयर्न द्वु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १६३—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. ... ... | २३८—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै ... | ९९०—० |

#### सोनें–चांदी–साखर

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ३४—७ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ५०—७ |
| साखर जावा (तयार) प्रत्येक हंड्रेडवेटास ... ... | १५—७ |
| „ केसर प्रत्येक मणास ... ... | ११–११ |
| „ सरया प्रत्येक मणास ... ... | ११—३ |


## औंध स्टेट सेंट्रल बँक लिमिटेड, औंध.

( स्थापना–८ आक्टोबर १९३२ )

हेड ऑफिस–औंध ( सातारा )

शाखा–आटपाडी, कुंडल, गुणदाळ, किंवूद स्टेशन व दिघंची.

चालू ठेवीवर शेंकडा दीड टक्का व्याज दिलें जातें. सेव्हिंग्ज ठेवीवर चेक स्वीकारून शेंकडा अडीच टक्के व्याज दिलें जातें. आम्ही मुदतीच्या ठेवीही स्वीकारतों. व्याजाचे दराबद्दल चौकशी करावी.

कर्जे–सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे वगैरेचे तारणावर कर्जे दिलीं जातात.

चेक, हुंड्या, ड्राफ्ट वगैरे वसूल करून दिले जातात.

शेअर खरेदीबद्दल व इतर माहितीबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

B. R. Vartak

मॅनेजर.

## स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यतः विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध **आर्डोमिक्स** ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या **आर्डोमिक्स**मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणांमध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत, बाटलीस रु. ३. ट. ख. १२ आणे निराळा. एकदम तीन बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह ९ रु.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठी मुख्य विक्रेतेः—

**धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डिपार्टमेंट नं. ६ )**

२५५/७ पेंडसे चाळ, सदाशिव पेठ, पुणें शहर.

**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

**पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,**

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.

एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ३९५ सदाशिव पेठ.

लक्षांत ठेवा ] १९३७-३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

**कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार**

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "**कॉमनवेल्थ**" नें सर्व विमा संस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यंत आभारी आहोत."

**श्री. आर. एन. अभ्यंकर,** बी. ए., एलएल. बी.,

**मॅनेजिंग एजंटस्,**

**दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड**

**११ बुधवार पेठ, पुणें नं. २.**

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजंटस् नेमणें आहेत. तरी विशेष माहितीकरितां हेडऑफिसकडे पत्रव्यवहार करावा.

**" अर्थ " ग्रन्थमाला**

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.

१ **बँका** आणि **त्यांचे व्यवहार**
२ **रिझर्व्ह बँक**
३ **व्यापारी उलाढाली**

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु. ( ट. ख. निराळा )

व्यवस्थापक, **'अर्थ' ग्रन्थमाला,** पुणें ४.

पत्ता बदलला

**मराठी केन्द्र**

ही

१ जानेवारी १९३८ पासून

२९२, सदाशिव पेठ, ट्रेनिंग कॉलेजजवळ गेली आहे.

**पुण्यांत फक्त १ च**
**मनपसंत कपडे शिवून देणारें**
**दि डेक्कन टेलरिंग फर्म**

**डेक्कन जिमखाना,** पुणें नं. ४.
नवीन कापडाचा जंगी स्टॉक.

चालक-**एम. एन. पाटसकर,** F. C. D. (London)




**पुणें एजंट:—ठाकूर देसाई आणि कं., बुधवार, पेठ, पुणें**
**अनुभविक पदवीधर वैद्याकडून मोफत तपासण्याची व्यवस्था.**
**सकाळीं ८ ते ९. सायंकाळीं ४॥ ते ५॥.**

**भारतीय अर्थशास्त्र**

लेखक:-**प्रो. वा. गो. काळे** व **प्रो. द. गो. कर्वे**

**पृष्ठसंख्या सुमारें ५५०; किंमत पांच रुपये**

प्रथमत: अर्थशास्त्राच्या सामान्य तत्त्वांचें विवेचन करून पुढें हिंदुस्थानाच्या सांपत्तिक व औद्योगिक परिस्थितीचा ह्या ग्रंथांत विस्तरश: विचार केलेला आहे. हिन्दी संस्कृति, राष्ट्रीय अर्थशास्त्र, शेतकीचा धंदा, मजुरांची चळवळ, हुंडणावळ, सहकारी चळवळ, संरक्षक धोरण, करपद्धति वगैरे सर्व महत्त्वाच्या प्रश्नांचें सांगोपांग विवेचन केलेलें वाचकांस आढळेल.

( सन १९१७ च्या म्हैसूर कंपन्यांच्या ८ व्या ॲक्टाअन्वयें सनदी करण्यांत आलेली )

# दि म्हैसूर सिल्क फिलेचर्स लि.

## प्रॉस्पेक्टस्

अधिकृत भांडवल
१० लक्ष रुपये
हें प्रत्येकीं
१० रुपयांच्या १ लक्ष
भागांमध्यें विभागलें
आहे

म्हैसूर दरबारच्या खास सवलती मिळालया आहेत.
वार्षिक फायद्याचा अंदाज पंधरा टक्के
**दि म्हैसूर सिल्क फिलेचर्स**
लि० बंगलोर
मॅनेजिंग एजंण्टस् : नाईक आणि कम्पनी
शेअर-विक्री ता. २६ जानेवारी १९३८ ला
सुरू होऊन दोन लक्ष रुपयांवर शेअर खपले.
महाराष्ट्रांत माहिती व शेअर अर्ज मिळण्याचीं ठिकाणें
श्री. आत्माराम रावजी भट, एम्. कॉम्., केसरी कचेरी, ५६८ नारायण, पुणें २.
मे. रानडे ब्रदर्स, एंजीनिअर्स, ६५३ बुधवार, पुणें.
महाराष्ट्र एजन्सीज्, गवत्या मारुतीसमोर, बुधवार पुणें.

तूर्त विक्रीस
काढलेलें भांडवल
४ लक्ष रुपये
हें प्रत्येकीं
१० रुपयांच्या
४० हजार भागांमध्यें
विभागलें आहे

अर्जासोबत २॥ रुपये ☞ हे भाग भरण्याची पद्धति अशी ☞ अर्जमंजुरीनंतर २॥ रुपये आणि राहिलेली रक्कम ५॥ रुपयांच्या दोन हप्त्यांनीं ज़रूर पडेल तेव्हां, पण अर्जमंजुरीनंतर तीन महिन्यांहून कमी अंतर असणार नाहीं अशा अवधीनें मागविण्यांत येईल.

नियामक आणि त्यांची मित्रमंडळी ह्यांनीं तूर्त विक्रीस काढलेल्या भांडवलापैकी १० हजार भाग घेण्याचें कबूल केलें असून ते त्यांस देण्यांत येतील. म्हैसूर सरकार १५ हजार रुपये किंमतीचे भाग घेण्यास वचनबद्ध झालें आहे. तसेंच सेरिकल्चरिस्टस् ( रेशीमवाले ) आणि रिअरर्स ( रेशीम किडे पाळणारे ) यांजकरितां २५०० भाग मुद्दाम राखून ठेवण्यांत आले आहेत.

### नियामक

१. श्री. एन्. रामराव, बी. ए., बी. एल., म्हैसूरच्या कॉमर्स आणि इंडस्ट्रीजचे डिरेक्टर (निवृत्त) चामराजपुरम्, म्हैसूर ( अध्यक्ष )
२. श्री. एच. एस. गोविंदराव, बी. ए., म्हैसूरच्या सेरिकल्चर खात्याचे सुपरिंटेंडेंट, म्हैसूर (सरकारी नियामक).
३. शेठ जीवनलाल चुनीलाल चिनाइ, मे. नगीनदास फुलचंद चिनाई यांचे भागीदार, रेशमाचे व्यापारी, मुंबई.
४. श्रीमती डी. साकम्मा, एम. आर. ए., दि म्हैसूर टोबॅको कंपनी लि. च्या नियामक, कॉफीच्या मळेवाल्या व पेढीवाल्या, बंगळूर शहर.
५. श्री. एस. व्ही. श्रीनिवास सेट्टी, सुताचे व्यापारी व पेढीवाले, बंगळूर शहर.
६. श्री. एम. बसवण्णा देवरू, एम. आर. ए., दि म्हैसूर स्पन सिल्क मिल्स लि. चे नियामक, रेशमाचे व्यापारी आणि सावकार, मम्बाळी.
७. श्री. नारायणराव जी. नाईक, एम. आर. ए., बंगळूरच्या श्रीराम सिल्क थ्रोइंग फॅक्टरीचे कार्यकारी मालक, दि म्हैसूर स्पन सिल्क मिल्स् लिमिटेडचे नियामक, तसेंच दि म्हैसूर स्टोन-वेअर पाइप्स ॲण्ड पॉटरीज लिमिटेडचे नियामक, बंगळूर शहर.
( मे. नाईक आणि कंपनी, मॅनेजिंग एजंटस यांच्यातर्फे एक्स-ऑफिशिओ ).
८. श्री. जी. कृष्णस्वामी, श्रीराम सिल्क थ्रोइंग फॅक्टरीचे व्यवस्थापक, बंगळूर शहर ( मे. नाईक आणि कंपनी, मॅनेजिंग एजंटस, यांच्यातर्फे एक्स-ऑफिशिओ. )

### पेढीवाले

दि इंपीरिअल बँक ऑफ इंडिया, बंगळूर आणि शाखा. दि बँक ऑफ म्हैसूर लिमिटेड, बंगळूर आणि शाखा. दि त्रावणकोर नॅशनल ॲण्ड क्विलन बँक लि., बंगळूर आणि शाखा. दि इंडियन बँक लि., बंगळूर आणि शाखा.

### कायद्याचे सल्लागार :

श्री. के. व्ही. सुब्बाराव, एम. ए., एलएल. बी., ॲडव्होकेट, चिकपेट, बंगळूर शहर.

### हिशेब-तपासनीस

श्री. एस. आर. मांडरे, एम्. ए., बी. कॉम., एफ़. एस. ए. ए., आर. ए., इन्कॉर्पोरेटेड अकाउंटंट ( लंडन ), ४७१ नागराथ पेट, बंगळूर शहर.

**मॅनेजिंग एजंटस् :**
मे. नाईक आणि कंपनी.

**रजिस्टर्ड ऑफिस:**
५१ गांधी-नगर, बंगळूर शहर

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यात रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गानिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.